महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७३५६, ४९२, ४४२
ई-मेल - desk2@dtemaharashtra.gov.in वेबसाईट : http://dte.maharashtra.gov.in

क्रमांक : २/एनजीसी/सीईटी परीक्षा केंद्र/२०२६/८८२ दिनांक 2' NOV 2026

परिपत्रक

विषय : सन २०२७ मधील CET परीक्षांसाठी संगणकाधारित परीक्षा केंद्रे (Computer-Based Test-CBT Centres) स्थापन करण्याकरिता संचालनालयांतर्गत सर्व पदविका संस्थांची इच्छुकता मागविणेबाबत

संदर्भ : मा.आयुक्त, महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचे पत्र क्र. तंशिप्र-१२२६/प्र.क्र.११/सीईटी/२०२६/२५८७, दि. ३०.१०.२०२६

महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्यामार्फत सन २०२७ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या सामाईक प्रवेश परीक्षांसाठी (CET-२०२७) संगणकाधारित परीक्षा केंद्रे स्थापन करण्याच्या अनुषंगाने, तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय, अनुदानित व विनाअनुदानित पदविका संस्थांमध्ये उपलब्ध असलेल्या संगणक प्रयोगशाळा व तांत्रिक पायाभूत सुविधांचा वापर परीक्षा केंद्रासाठी करण्याकरीता संबंधित संस्थांना कळविण्याकरीता संदर्भीय पत्रान्वये संचालनालयास कळविले आहे. तसेच याबाबतची सविस्तर माहिती, आवश्यक पायाभूत सुविधांचे निकष, इच्छुकता व आवश्यक माहिती दि.४.११.२०२६ रोजी पर्यंत सादर करण्यास कळविले आहे. सदर पत्राची प्रत पदविका संस्थांच्या माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे.

संगणकाधारित परीक्षा केंद्र म्हणून सहभागी होण्यास इच्छुक असलेल्या संस्थांनी सोबतच्या पत्राचे अवलोकन करून, विहीत मुदतीत Google Form द्वारे आपली इच्छुकता व आवश्यक माहिती, महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्याकडे विहीत मुदतीत सादर करावी.

(डॉ.प्रमोद नाईक)
प्र.संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : १)मा. आयुक्त, महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांना माहितीसाठी
२)सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर
त्यांना कळविण्यात येते की, आपल्या विभागांतर्गत पदविका संस्थांनी सदर प्रकरणी माहिती भरून ती विहीत मुदतीत सीईटी कक्षाकडे सादर करण्यास कळविण्यात यावे.
३)कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक ३, मुख्य कार्यालय, मुंबई
त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.

महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्ष
८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.
दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org

क्र.तंशिप्र-१२२६/प्र.क्र.९९ /सीईटी/२०२६/२५८७ दिनांक - 30/01/2026

प्रति,
संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७,
मुंबई ४००००१.

**विषय - सन २०२७ मधील CET परीक्षांसाठी संगणकाधारित परीक्षा केंद्रे (Computer-Based Test - CBT Centres) स्थापन करण्याकरिता संचालनालया अंतर्गत सर्व पदविका संस्थांची इच्छुकता मागविणेबाबत...**

महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्यामार्फत सन २०२७ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या सामाईक प्रवेश परीक्षा (CET Examinations - २०२७) सुरळीतपणे पार पाडण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्र राज्यात संगणकाधारित परीक्षा केंद्रांचे (Computer-Based Test Centres) जाळे उभारण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

सन २०२७ मधील प्रवेश परीक्षांसाठी उमेदवारांच्या नोंदणीची संख्या अंदाजे १५ लाख किंवा त्यापेक्षा अधिक होण्याची शक्यता लक्षात घेता, तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखाली सर्व शासकीय, अनुदानित व विनाअनुदानित पदविका संस्थांमध्ये उपलब्ध असलेल्या सुसज्ज संगणक प्रयोगशाळा व तांत्रिक पायाभूत सुविधांचा वापर परीक्षा केंद्रांसाठी करण्याबाबत संबंधित संस्थांना आपल्या स्तरावरून निर्देशित करण्यात यावे.

प्रस्तावित संगणकाधारित परीक्षा केंद्रांचा वापर खालील प्रवेश परीक्षा आयोजित करण्यासाठी करण्यात येऊ शकतो. यामध्ये खालील परीक्षांचा समावेश असेल; तथापि, ही यादी केवळ उदाहरणादाखल असून ती सर्वंकष मर्यादित नाही.

१. MHT-CET (PCM व PCB)
२. MBA/MMS-CET
३. MCA-CET
४. Law CET (विधी प्रवेश परीक्षा)
५. Education CET (शिक्षणशास्त्र प्रवेश परीक्षा)
६. Nursing CET (नर्सिंग प्रवेश परीक्षा)
७. BHMCT/BBA/BMS/BBM/BCA CET
८. इतर आवश्यकतेनुसार आयोजित करण्यात येणाऱ्या सामाईक प्रवेश परीक्षा.

- **किमान पायाभूत सुविधा व आवश्यक निकष (Minimum Infrastructure Requirements)**

संगणकाधारित परीक्षा केंद्र म्हणून काम करण्यास इच्छुक असलेल्या संस्थांकडे खालील सुविधा उपलब्ध असणे आवश्यक आहे:

- परीक्षेसाठी किमान ५० पेक्षा जास्त कार्यरत संगणक संच (Functional Computer Nodes) उपलब्ध असणे आवश्यक आहे.
- पुरेशी व विश्वसनीय इंटरनेट कनेक्टिव्हिटी.
- योग्य LAN/नेटवर्किंग सुविधा.
- अखंडित वीजपुरवठा तसेच योग्य पर्यायी वीजपुरवठ्याची (Power Backup) व्यवस्था.
- परीक्षार्थींसाठी पुरेशी बैठक व्यवस्था व आवश्यक परीक्षा कक्ष.
- संगणकाधारित परीक्षा सुरळीतपणे आयोजित करण्यासाठी आवश्यक इतर तांत्रिक व पायाभूत सुविधा.

- **इच्छुकता सादर करण्याबाबत (Submission of Willingness)**

संगणकाधारित परीक्षा केंद्र म्हणून सहभागी होण्यास इच्छुक असलेल्या संस्थांनी आपली इच्छुकता व संस्थेच्या पायाभूत सुविधांबाबतची आवश्यक माहिती खालील Google Form द्वारे सादर करावी.

- Google Form Link:
  https://forms.gle/EujZZoDuyLTrEZDr8

संस्थांकडून प्राप्त होणाऱ्या माहितीच्या आधारे महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत पुढील समन्वय, पायाभूत सुविधांचे मूल्यमापन तसेच संभाव्य परीक्षा केंद्रांची प्रत्यक्ष तपासणी करण्यात येईल. परीक्षा केंद्रांची अंतिम निवड ही प्रत्यक्ष तपासणी, तांत्रिक पात्रता व सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेच्या अधीन राहील.

महाराष्ट्र राज्यातील परीक्षा पायाभूत सुविधांचे बळकटीकरण करण्यासाठी तसेच सन २०२७ मधील सामाईक प्रवेश परीक्षा सुरळीत, सुरक्षित, पारदर्शक व कार्यक्षम पद्धतीने पार पाडण्यासाठी आपल्या संस्थेचे सहकार्य अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

त्यामुळे सर्व इच्छुक संस्थांनी आपली इच्छुकता व आवश्यक माहिती वरील Google Form द्वारे **दिनांक ०४ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत** सादर करावी, ही विनंती.

(दिलीप सरदेसाई, भा.प्र.से.)
महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा
(सीईटी) कक्ष, मुंबई

# Institute Willingness for CET 2027 Computer Based Test CBT Centre

Please submit your Willingness for upcoming CET 2027 Computer Based Test CBT Centre (All Engineering, Management, Pharmacy, Architecture, BBA, BCA, MCA institutions )

**desk2@dtemaharashtra.gov.in** Switch account

* Indicates required question

Email *

Your email

Select Institute Region *

Choose

Select Institute District *

- Mumbai City
- Mumbai Suburban
- Thane
- Palghar
- Raigad
- Ratnagiri
- Sindhudurg
- Pune
- Satara
- Sangli
- Solapur
- Kolhapur
- Nashik
- Ahilyanagar
- Dhule
- Nandurbar
- Jalgaon
- Chhatrapati Sambhajinagar
- Jalna
- Beed
- Dharashiv
- Latur
- Nanded
- Parbhani

- Hingoli
- Amravati
- Akola
- Washim
- Buldhana
- Yavatmal
- Nagpur
- Wardha
- Bhandara
- Gondia
- Chandrapur
- Gadchiroli

Institute Name with Address in Detail Taluka, District with Pincode *

Your answer

Name of the Principal/Director *

Your answer

Contact Number (Mobile) of the Principal/Director *

Your answer

Official Email of the Principal/Director *

Your answer

Name of the Administrative Officer/ Registrar *

Your answer

Contact number (Mobile) of the Administrative Officer/ Registrar *

Your answer

official Email of the Administrative Officer/ Registrar *

Your answer

Name of Single Point of Contact SPOC for CBT Center with Designation *

Your answer

Contact number (Mobile) of Single Point of Contact SPOC for CBT Center *

Your answer

Official Email of Single Point of Contact SPOC for CBT Center *

Your answer

Number Nodes available *

Your answer

Willingness for following CET (Multiple Selection Permitted ) *

- [ ] MHT CET PCM
- [ ] MHT CET PCB
- [ ] MBA/MMS
- [ ] MCA
- [ ] BHMCT/BBA/BMS/BBM
- [ ] B Ed/ M. Ed
- [ ] Nursing
- [ ] Law 3 Year / Law 5 Year
- [ ] M HMCT
- [ ] Any Other CET Conducted by State CET Cell Mumbai

Any Remarks

Your answer

Submit Clear form

Never submit passwords through Google Forms.

This form was created inside of MAHA CET. - Contact form owner

Does this form look suspicious? Report

Google Forms